# प्रकरण – १० : भारतातील आर्थिक नियोजन

**प्रस्तावना :**

नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये भारत सरकार ने केली. पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. नियोजन आयोगामध्ये बँकींग, वित्त, उद्योग या विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ असतात. आर्थिक नियोजनाची रूपरेषा तयार करण्याचे उत्तरदायित्व हे नियोजन आयोगाचे असते.

**माहिती गोळा करा :**

१) मुंबई योजना	२) जनता योजना

३) गांधी योजना

**आर्थिक नियोजनाचा अर्थ आणि व्याख्या :**

उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करून नियोजित यंत्रणेद्वारे निर्धारित उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचा एक कालबद्ध कार्यक्रम म्हणजे आर्थिक नियोजन होय.

**डॉ. एच. डी. डिकिन्सन :**


''आर्थिक नियोजन म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेची तपशीलवार पाहणी करून त्या आधारावर कोणत्या वस्तूंचे, किती प्रमाणात आणि कसे उत्पादन करायचे, किती प्रमाणात केव्हा आणि कुठे उत्पादन करायचे आणि त्याचे वितरण कशा प्रकारे करायचे याबाबत महत्त्वाचे निर्णय मध्यवर्ती सत्तेने जाणीवपूर्वक घेणे होय''.

**श्रीमती बार्बरा वुटन :**

''सार्वजनिक सत्तेने आर्थिक अग्रक्रमांची जाणीवपूर्वक आणि हेतुपुरःस्सर केलेली निवड म्हणजे आर्थिक नियोजन होय''.

**आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये :**

आर्थिक नियोजनाची खालील वैशिष्ट्ये आहेत :




१) **मध्यवर्ती नियोजन सत्ता :** प्रत्येक देशात केंद्रीय नियोजन आयोग असतो व ते आर्थिक नियोजन करतात. भारतामध्ये याला नियोजन आयोग म्हणतात. नियोजन आयोगाला योजना तयार करण्याचा पूर्ण अधिकार होता. नियोजन आयोगाची पुर्नरचना करून २०१५ साली निती आयोगाची स्थापना करण्यात आली.

२) **पाहणी :** नैसर्गिक व मानवी साधनसंपत्ती यांची उपलब्धता व उपयुक्तता विचारात घेऊन संपूर्ण अर्थव्यवस्थेची पाहणी केली जाते.

३) **उद्दिष्टे :** आर्थिक नियोजन हे पूर्वनिर्धारित व निश्चित अशा उद्दिष्टांवर आधारित असते जे वास्तववादी व लवचीक असतात.

४) **प्राधान्यक्रम आणि लक्ष्य :** आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आर्थिक नियोजनात प्रत्येक क्षेत्राच्या महत्त्वानुसार प्राधान्यक्रम ठरविला जातो. लक्ष्य ठरवून उद्दिष्टे प्राप्तीसाठी ठोस पावले उचलली जातात.

५) **संसाधनांची जुळवाजुळव :** नियोजन करण्यासाठी लागणारी विविध आवश्यक संसाधने उदा. कर आकारणे, घरगुती बचत, तुटीचा अर्थभरणा, बाह्य साहाय्य, सार्वजनिक कर्ज यांची जुळवाजुळव आवश्यक आहे.

६) **योजना कालावधी :** नियोजनाचा कालावधी गरजेनुसार वेगवेगळा असू शकतो. भारतासारख्या अनेक देशांमध्ये नियोजनाचा काळ पाच वर्षे इतका असतो.

७) **मूल्यमापन :** नियोजनातील उद्दिष्टे आणि प्राथमिकता यांतील होणारे बदल समाविष्ट करण्यासाठी मध्यावधी परिक्षण गरजेचे असते. त्यासाठी ठराविक कालावधीनंतर योजनांचे मूल्यमापन केले जाते.

८) **सतत चालणारी प्रक्रिया :** आर्थिक नियोजन ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे देशाच्या आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठले जाते.

९) **समन्वय :** केंद्राप्रमाणे राज्यांमध्येही नियोजन केले जाते. त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम केले जाते.

१०) **लवचिकता :** मध्यवर्ती नियोजन प्राधिकरण आर्थिक नियोजन करताना लवचिकतेचा दृष्टीकोन समोर ठेवून आवश्यकतेनुसार अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात समन्वय साधते. त्यानुसार अंमलबजावणीतही लवचिकता साधते.

**तुम्हांला माहीत हवं :**

**एका दृष्टिक्षेपात पंचवार्षिक योजना**

| नियोजन | कालावधी | मुख्य उद्दिष्ट्ये/व्यूहरचना | अपेक्षित लक्ष्य % | साध्यपूर्ती % |
|---|---|---|---|---|
| पहिली पंचवार्षिक योजना | १९५१-१९५६ | कृषी क्षेत्राचा विकास | २.१ | ३.६ |
| दुसरी पंचवार्षिक योजना | १९५६-१९६१ | अवजड उद्योगांचा विकास | ४.५ | ४.१ |
| तिसरी पंचवार्षिक योजना | १९६१-१९६६ | उद्योग व कृषी क्षेत्र दोन्हींचा विकास | ५.६ | २.७ |
| वार्षिक नियोजन | १९६६-१९६९ | - | - | - |
| चौथी पंचवार्षिक योजना | १९६९-१९७४ | स्थैर्यासह आर्थिक विकास | ५.७ | ३.३ |
| पाचवी पंचवार्षिक योजना | १९७४-१९७९ | दारिद्र्याचे निर्मूलन | ४.४ | ४.८ |
| साखळी योजना | १९७८-१९८० | - | - | - |
| सहावी पंचवार्षिक योजना | १९८०-१९८५ | जीवनमानाची गुणवत्ता सुधारणे | ५.२ | ५.७ |
| सातवी पंचवार्षिक योजना | १९८५-१९९० | समाजकल्याण आणि दारिद्र्य निर्मूलन | ५.० | ६.० |
| सुट्टीचा कालावधी | १९९०-१९९२ | - | - | - |
| आठवी पंचवार्षिक योजना | १९९२-१९९७ | अर्थव्यवस्थेला गती देणे | ५.६ | ६.८ |
| नववी पंचवार्षिक योजना | १९९७-२००२ | सामाजिक न्याय व समानतेसह आर्थिक वृद्धी प्राप्त करणे | ७.० | ५.६ |
| दहावी पंचवार्षिक योजना | २००२-२००७ | दारिद्र्य कमी करणे | ८.२ | ७.८ |
| अकरावी पंचवार्षिक योजना | २००७-२०१२ | जलद व सर्वसमावेशक वृद्धी | ८.१ | ७.९ |
| बारावी पंचवार्षिक योजना | २०१२-२०१७ | जलद व शाश्वत सर्वसमावेशक वृद्धी | ८.० | - |

**तक्ता क्र.१०.१** **स्त्रोत :** पंचवार्षिक योजनांचे अहवाल, नियोजन मंडळ, भारत सरकार

**हे करून पहा :**

वरील तक्त्यातील साध्यपूर्तींच्या आकडेवारीवरून सहावे दशमक व नववे दशमक काढा.

## बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७)

बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी २०१२-१७ असून 'जलद व शाश्वत वृद्धीवर' लक्ष्य केंद्रित केले आहे. सरकारी खर्चातून भारतातील शेती, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कल्याण यांच्या विकासाला प्रोत्साहन देणे हे या योजनेचे अपेक्षित उद्दिष्ट आहे. तसेच उत्पादन क्षेत्राच्या विकासातून रोजगार निर्मिती करणे हेही अपेक्षित आहे.

### बाराव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे :

**१) आर्थिक वृद्धी :**

- वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पादन वृद्धीचा दर ८% पर्यंत प्राप्त करणे.
- शेतीचा वृद्धी दर ४.०% पर्यंत प्राप्त करणे.
- औद्योगिक व उत्पादन वृद्धीचा दर १०% पर्यंत प्राप्त करणे.
- प्रत्येक राज्याचा सरासरी वृद्धी दर हा अकराव्या पंचवार्षिक योजनेपेक्षा बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये वाढविणे.

**२) दारिद्र्य व रोजगार :**

- दारिद्र्याचे दरडोई गुणोत्तर १०% पर्यंत टक्क्यांनी कमी करणे.
- शेती क्षेत्राव्यतिरिक्त ५ कोटी नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

**३) शिक्षण :**

- योजनेच्या अखेरपर्यंत किमान सात वर्षापर्यंत शाळेत राहण्याचा कालावधी वाढविणे.
- कौशल्याधिष्ठित उच्च शिक्षणाच्या संधी निर्माण करणे

- योजनेच्या अखेरीस शाळेतील पटनोंदणीतील लिंगभेद व सामाजिक अंतर कमी करणे.

### ४) आरोग्य :

- प्रजनन दर २.१% पर्यंत कमी करणे.
- ०-३ वयोगटातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणीच्या (NFHS) - तिसऱ्या स्तराच्या अर्ध्यापर्यंत कमी करणे.

**शोधा पाहू :**

NFHS च्या वेगवेगळया पातळ्यांची माहिती संकलित करा.

### ५) पायाभूत सुविधा :

- पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ९% पर्यंत वाढ घडवून आणणे.
- सर्व खेडी पक्क्या रस्त्यांनी जोडणे.
- ग्रामीण दूरध्वनीची व दूरदर्शनची घनता ७०% पर्यंत वाढवणे.

### ६) पर्यावरण व शाश्वतता :

- बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दरवर्षी १० लाख हेक्टर इतके वनराई क्षेत्र वाढविणे.

### ७) सेवा पुरविणे :

- योजनेच्या अखेरीस ९०% भारतीयांना बँकिंग सेवा पुरविणे. बँक खात्यांची जोडणी 'आधाराशी' करणे.
- अनुदाने व सरकारकडून मिळणाऱ्या लाभाची रक्कम लाभधारकाच्या खात्यात थेट जमा करणे.

## क) निती आयोग (नॅशनल इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मिंग इंडिया) :

बारावी पंचवार्षिक योजनेचा कालावधी ३१ मार्च २०१७ रोजी संपला. पुढील कार्यपूर्ततेसाठी या योजनेस ४ ऑक्टोबर २०१७ अशी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. या दरम्यान नियोजन आयोगाऐवजी निती आयोगाची निर्मिती करण्यात आली. निती आयोगाची स्थापना हे नावीन्यपूर्ण पाऊल आहे. यामागे संघटन व विकेंद्रीकरणाची तत्त्वे अधिक मजबूत करणे तसेच आर्थिक वृद्धी व विकासाचा वेग वाढविणे अशी उद्दिष्ट्ये आहेत. निती आयोगाचा ठराव १ जानेवारी २०१५ साली मंजूर झाला, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी बारावी पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतर सुरू झाली.

### थिंक टँक कार्ये :

निती आयोग हा भारत सरकारचे धोरण राबविणारा प्रमुख विचारगट आहे. त्याकरिता राष्ट्रीय विकासासाठी दूरदृष्टी ठेवून त्यामध्ये राज्यांना उत्साहाने सहभागी होण्याकरिता तो भाग पाडतो. तो संघराज्यांना सहकार्यासाठी काम करणे, संरचनात्मक आधार देऊन व धोरणासाठी राज्यांना सतत मार्गदर्शन करतो.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**थिंक टँकचा अर्थ**

थिंक टँक हा एखाद्या संस्थेने विशेषतः शासनाने एकत्रित आणलेल्या तज्ज्ञांचा असा समूह आहे की जो विविध समस्यांवर चर्चा करून त्या समस्या विविध मार्गांनी सोडविण्याचा प्रयत्न करतो.

### थिंक टँकचे मुख्य आधार स्तंभ :

१) भारताचा दृष्टी दस्तऐवज (Vision Document of India.)

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेचे मूल्यमापन दस्तऐवज

३) 'परिवर्तनशील भारत' (ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) या विषयावर निती आयोगामार्फत व्याख्याने आयोजित करणे.

४) शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न

५) फलश्रुती अंदाजपत्रक आणि उत्पादन फलश्रुती आराखडा

६) जागतिक उद्योजकांची शिखर परिषद २०१७

७) मागासलेल्या जिल्ह्यांची निवड करून त्यांना सक्षम करण्यासाठी कार्यक्रम राबविणे.

### निती आयोगाची रचना :

१ जानेवारी २०१५ ला ठराव करून निती आयोगाची अंमलबजावणी १६ फेब्रुवारी २०१५ पासून झाली. निती आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.

### निती आयोगाचे सदस्य :

१) **शासकीय परिषद :** यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल.

२) **प्रादेशिक परिषद :** यात संभाव्य उदभवणाऱ्या विशिष्ट घटना व विशिष्ट महत्वाचे विषय यांच्या निराकरणासाठी राज्य किंवा प्रदेशाचा समावेश असलेली परिषद.

३) **विशेष आमंत्रित :** यांमध्ये विशिष्ट विषयांचे ज्ञान असणारे तज्ज्ञ व व्यावसायिक यांची निवड पंतप्रधान करतात.

४) **संस्थात्मक संरचना :** पंतप्रधानांच्या व्यतिरिक्त खालील सदस्य त्यात सामावलेले असतात.

- **अध्यक्ष :** भारताचे पंतप्रधान
- **उपाध्यक्ष :** पंतप्रधानांकडून नियुक्ती

  पूर्ण वेळ सदस्य - ५

  अर्ध वेळ सदस्य - २
- **पदसिद्ध सदस्य :** पंतप्रधानांनी नियुक्त केलेले मंत्रिमंडळातील जास्तीत जास्त चार सदस्य
- **मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) :** पंतप्रधानांनी एका ठराविक कालावधीसाठी नियुक्त केलेला भारत सरकारच्या सचिव पदावरील मुख्य कार्यकारी अधिकारी
- **सचिवालय :** आवश्यकतेनुसार नियुक्ती

**हे करून पहा :**

निती आयोगाची सध्याची रचना सांगा व खालील रकान्यात सदस्यांची नावे लिहा.

**निती आयोग**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सदस्य |
|---|---|---|
| | | |

### निती आयोगाची कार्ये :

१) **राष्ट्रीय सर्वसमावेशक विषयपत्रिका :** राज्यांच्या सक्रिय सहभागाने राष्ट्रीय विकासप्राधान्य आणि धोरणांचा सामाजिक दृष्टिकोन विकसित करणे. पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना राष्ट्रीय विषयपत्रिकेची रचना पुरविली गेल्यामुळे योजनेची अंमलबजावणी करणे सोईचे होईल.

२) **निती आयोग हा राज्याचा सर्वांत चांगला मित्र :** विविध समस्यांचा सामना करण्यासाठी तसेच राज्यांच्या तुलनात्मक फायद्यासाठी राज्यांना सहकार्य करणे, मंत्रिमंडळातील विविध खाती आणि त्यांच्याकडे असलेल्या विविध कल्पना राबविण्यासाठी उपयुक्त सल्ला देणे आणि त्यांची कार्यक्षमता वाढविणे. यासाठी निती आयोग हा केंद्रातील राज्यांचा सर्वात चांगला मित्र आहे.

३) **विकेंद्रित नियोजन :** नियोजन कार्यक्रमाची पुनर्रचना करणे त्यानुसार ग्रामीण स्तरापासून केंद्रस्तरापर्यंत त्याची अंमलबजावणी करणे.

४) **ज्ञानाचे नावीन्य केंद्र :** राज्यकारभाराद्वारे एक संशोधनकर्ता तसेच संशोधनाचे प्रसारक आणि सुशासनविषयक सर्वोत्तम कृती तयार करणे. संसाधन केंद्र जे ओळख व विश्लेषण करते व त्याची प्रतिकृती सुलभ करणे.

५) **देखरेख आणि मूल्यमापन :** धोरणाच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे व त्यांच्या परिणामांचे काटेकोर-पाठपुराव्यानिशी मूल्यमापन करणे. सर्व व्यापक कार्यक्रम मूल्यांकनाद्वारे साध्य करणे. गरज असलेल्या गोष्टींमध्ये दुरुस्ती करून त्यांतील दोष ओळखणे आणि कालखंड ठरवून धोरण अधिक कार्यक्षम करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

६) **सहकारात्मक आणि स्पर्धात्मक संघटन :** प्राथमिक स्तरावर सहकारी संघटन कार्यान्वित करणे, राज्यांचा सक्रिय सहभाग वाढवून राष्ट्रीय धोरण तयार करणे. पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या संयुक्त अधिकारात संख्यात्मक व गुणात्मक उद्दिष्टांची कालबद्ध अंमलबजावणी व पूर्तता करणे.

७) **इतर कार्ये :**

- आंतर सल्लागार
- विवाद निराकरण
- तंत्रज्ञान अद्यावतीकरण

**नियोजन आयोग व निती आयोग यातील तुलना :**

| नियोजन आयोग | निती आयोग |
|---|---|
| १) नियोजन मंडळाची स्थापना १५ मार्च १९५० मध्ये झाली होती. | १) निती आयोगाची स्थापना १ जानेवारी २०१५ मध्ये झाली. |
| २) नियोजन आयोग मंत्रालय व राज्य सरकारला निधी पुरवित असे. | २) निती आयोग थिंक टँक आहे. निधींचा पुरवठा वित्त मंत्रालयामार्फत केला जातो. |
| ३) राज्याची भूमिका राष्ट्रीय विकास परिषदे पुरती (NDC) मर्यादित ठेवून, नियोजन बैठकांद्वारे संवाद करणे. | ३) राज्य सरकारची भूमिका नियोजन मंडळापेक्षा जास्त महत्त्वाची असणे अपेक्षित आहे. |
| ४) सचिव किंवा सदस्य नेहमीच्या प्रक्रियेद्वारे नियुक्त होतात. | ४) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती पंतप्रधान करतात. |
| ५) नियोजन आयोगाकडे अर्धवेळ काम करणाऱ्या सदस्यांची तरतूद नव्हती. | ५) निती आयोगाकडे दोन अर्धवेळ सदस्य गरजेनुसार काम करतात. |
| ६) नियोजन आयोगाकडे असलेला अध्यक्ष, सचिव सदस्य व पूर्ण वेळ काम करणारे सदस्य होते. | ६) निती आयोगात अध्यक्ष, उपाध्यक्ष, पूर्ण वेळ सदस्य, अर्धवेळ सदस्य, सचिव पदाचे कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश आहे. |
| ७) नियोजन आयोग राज्यांसाठी धोरणे लागू करणे आणि प्रकल्पांना मंजुरी देऊन निधी वाटपाचे काम करत असे. | ७) निती आयोग हा केवळ विचार विनिमय करणारा गट असून त्यास धोरणे बनविण्याचा अधिकार नाही. |

## स्वाध्याय

**प्र.१. योग्य पर्याय निवडा :**

**१) आर्थिक नियोजनाच्या बाबतीत खालील बाबी बरोबर आहेत.**

अ) नियोजन आयोगाची स्थापना १९५० मध्ये करण्यात आली.

ब) पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे पद्सिद्ध अध्यक्ष असतात.

क) आर्थिक नियोजन हा एक कालबद्ध कार्यक्रम आहे.

ड) आर्थिक नियोजन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

**पर्याय :** १) अ आणि ब　　२) अ, ब, क आणि ड
३) अ आणि क　　४) यापैकी नाही.

**२) खालील पर्यायांमधून चुकीचा पर्याय ओळखा.**

अ) पहिल्या पंचवार्षिक योजनेचे कृषी क्षेत्राचा विकास करणे हे उदि्दष्ट होते.

ब) सातव्या पंचवार्षिक योजनेत समाजकल्याण आणि दारिद्र्या निर्मूलन यावर भर दिला होता.

क) बाराव्या पंचवार्षिक योजनेने जलद सर्वसमावेशक वृद्धीवर भर दिला आहे.

ड) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा भर कृषी आणि औद्योगिक विकास यावर होता.

**पर्याय :** १) फक्त अ　　२) अ, ब आणि ड
३) फक्त क　　४) ब आणि ड

**३) योग्य पर्यायांची जोडी ओळखा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) आर्थिक नियोजन | अ) पंतप्रधानाकडून निवड |
| २) बारावी पंचवार्षिक योजना | ब) भारत सरकारचे धोरण राबविणारा विचार गट |
| ३) निती आयोग | क) जलद व शाश्वत वृद्धी |
| ४) निती आयोग उपाध्यक्ष | ड) कालबद्ध कार्यक्रम |

**पर्याय :** अ) १-क, २-अ, ३-ड, ४-ब
ब) १-ड, २-ब, ३-अ, ४-क
क) १-ड, २-क, ३-ब, ४-अ
ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

**४) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

**विधान '१' :** निती अयोगाचा ठराव हा भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलती गतिशीलता दाखवितो.

**विधान '२' :** आर्थिक, सामाजिक, तांत्रिक बदलांचा विचार करून मागासलेल्या जिल्ह्यांना सक्षम करण्यासाठी ही संस्था विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करते व त्यांतून आर्थिक बदल घडवून आणते.

**पर्याय :** १) विधान '१' सत्य आहे.

२) विधान '२' सत्य आहे.

३) विधान '१' चा परिणाम विधान '२' आहे.

४) विधान '१' आणि '२' यांचा परस्परसंबंध नाही.

**प्र. २. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :**

१) सार्वजनिक सत्तेने आर्थिक प्राधान्यक्रमांची जाणीवपूर्वक आणि सहेतुक केलेली निवड.

२) अशा तज्ज्ञ व्यक्तींचा समूह, की जो शासनाद्वारे एकत्रित केलेला असतो व जो विविध समस्यांचा विचार करून त्या समस्या विविध मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न करतो.

**प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) सायलीची आई घरचा हिशेब लावण्यासाठी वही ठेवते व त्यातून सर्व खर्चाचे नियोजन करते.

२) रमाबाईंच्या घरगुती गॅसचे अनुदान थेट त्यांच्या खात्यात जमा होते.

३) वर्गातील समस्या सोडविण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांचा गट तयार करतात, हा गट समस्यांवर चर्चा करून उपाय सुचवतो.

**प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

३) निती आयोगाची रचना स्पष्ट करा.

४) निती आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

५) नियोजन आयोग आणि निती आयोग यांतील फरक स्पष्ट करा.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) आर्थिक नियोजन आयोगाची कार्ये आता निती आयोगाकडे आहेत.

२) बाराव्या पंचवार्षिक योजनेत जलद व शाश्वत वृद्धी प्राप्त झाली.

**प्र. ६. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या :**

भारतात केंद्रीय अर्थमंत्री दरवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतात. फेब्रुवारीनंतर येणाऱ्या एप्रिल ते मार्च या कालावधीत किती महसूल गोळा होईल व देशाला वर्षभरात किती खर्च करावा लागेल. याचा अंदाज या अर्थसंकल्पात मांडला जातो. करप्रणालीतील बदल यात सुचविले जातात. संरक्षण, शिक्षण, संशोधन व विकास आदींबाबत तरतूद यात केली जाते. अर्थसंकल्पाची तारीख एक महिना अलीकडे आणत १ फेब्रुवारी केली आहे, जेणेकरून आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच निधी उपलब्ध होईल.

१) भारतीय अर्थसंकल्प कोठे सादर केला जातो?

२) कोणत्या गोष्टींचा अंदाज अर्थसंकल्पात मांडला जातो?

३) अर्थसंकल्पाची तारीख १ फेब्रुवारी का केली आहे?

४) अर्थसंकल्पाची संकल्पना स्पष्ट करा.